# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०३/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन उमरेड चे अभिलेखावरील अट्टल गुन्हेगार भास्कर सतिष हेडावु यास नागपूर जिल्हयातुन हद्दपार (तडीपार)

पोलीस स्टेशन उमरेड हददीत ईतवारीपेठ उमरेड येथे राहणारा भास्कर सतिष हेडावु वय २७ वर्ष याचेवर पोलीस स्टेशन उमरेड येथे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. भास्कर सतिष हेडावु याचे विरुध्द अपहरण, खंडणी, लुटपाट करणे, इतरांना दुखापत करणे, धमकावने, अवैध घातक शस्त्रे जवळ बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत. भास्कर सतिष हेडावु याचे विरुध्द सन २०१४ ते २०२३ या कालावधीमध्ये विविध कलमांन्वये एकूण ०५ गुन्हे दाखल आहेत. भास्कर सतिष हेडावु याचे या गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसावा याकरिता त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली मात्र या प्रतिबंधक कारवाईलाही न जुमानता त्याचे गुन्हेगारीकृत्य सुरुच होते. त्याचे अशा गुन्हेगारी वृत्तीमुळे परिसरातील नागरिकांच्या मनात भिती निर्माण होवुन नागरिक सहजासहजी त्याचे विरुध्द तक्रार देण्यास उघडपणे समोर येत नव्हते.

करिता पोस्टे उमरेड परिसरात सामाजिक स्वास्थ व सुव्यवस्था कायम रहावी या करिता भास्कर सतिष हेडायु यास नागपूर जिल्हयातुन हद्दपार करण्याकरिताचा प्रस्ताव पोलीस स्टेशन उमरेड कडून मा. उपविभागीय अधिकारी, उमरेड यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची पुर्ण चौकशीअंती मा. उपविभागीय अधिकारी, उमरेड यांनी दिनांक २२/०३/२०२४ रोजी भास्कर सतिष हेडावु यास नागपूर जिल्हा हद्दीतुन हददपार (तडीपार) करण्याचा आदेश पारीत केला. सदर आदेशाची दिनांक २९/०३/२०२४ रोजी भास्कर सतिष हेडावु याचेवर बजावनी करण्यात आली व त्यास नागपूर जिल्हा हददीबाहेर जिल्हा चंद्रपूर येथे नेवुन सोडण्यात आले आहे.

आगामी काळात येणा–या लोकसभा निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था टिकुण राहवी याकरिता पोलीस स्टेशन उमरेडच्या अभिलेखावर असणा–या १) सादिक उर्फ अड्डु उस्मान शेख रा. जुनाबैलबाजार ईतवारी उमरेड, २) सुनिल श्रीकृष्ण घरत रा. पिरावा ता भिवापूर, ३) भास्कर सतिष हेडावु रा. जोगीठाणापेठ उमरेड असे एकुण ०३ आरोपीतांना मार्च २०२४ मध्ये नागपूर जिल्हयातुन हद्दपार (तडीपार) करण्यात आलेले आहे. तसेच यापुर्वी ऑक्टोंबर २०२३ मध्ये अवैध दारुविक्रीचा व्यवसाय करणारा गोपिचंद फकरु मांढरे रा. गांगापूर उमरेड यास एमपीडीए कायदया अंतर्गत स्थानबध्द करण्यात आले होते. पोलीस स्टेशन उमरेडचे रेकॉर्ड वरील इतरही गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सर्व इसमांवर पो.स्टे. उमरेडचे अधिकारी, अंमलदार तसेच गोपनिय यंत्रणा लक्ष ठेवुन असुन कोणत्याही बेकायदेशीर कृत्याची तात्काळ दखल घेवुन गुन्हेगारांवर वेळीच कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ, अप्पर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री राजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री प्रमोद घोंगे, सफी संजय देशमुख, पोहवा विष्णु जायभाये, पोकों संदिप गुटटे, पोकों उमेश मोहुर्ले यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर